# कार्यालय नगर परिषद, पुलगाव, जिल्हा वर्धा

जा.क्र नपपु/नरवि./कावी-९५२/२१ दिनांक १२/०२/२०२१

**महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ व महाराष्ट्र नगर पालीका नगर पंचायती व औद्योगिक वसाहत अधिनियम १९६५ चे कलम १८९ अन्वये जोता लेव्हल पर्यंत (Plinth Level) बांधकाम मंजुरी आदेश (सुधारित बांधकाम परवानगी)**

प्रति,
श्री. मधुसूदन एस. गांधी,
पुलगाव

विषयः- निवासी/**वाणिज्यिक** बांधकाम परवानगी बाबत

संदर्भः 1. बांधकाम परवानगी क्रं CCWPM/B/२०१९/APL/०००१२ दि. १४/०६/२०१९

२. आपले सुधारित बांधकाम परवानगी करिता अर्ज क्रं. १०७ दि. २७/०१/२०२१

वरील विषयाचे अनुषंगाने संदर्भिय क्रं 1 अन्वये आपणास बांधकाम परवानगी देण्यात आली होती. संदर्भ क्रं. 2 अन्वये सुधारित बांधकाम परवानगी करिता अर्ज या कार्यालयास सादर केला आहे. आपल्या अर्जाकरीता नगर परिषद हद्दीतील प्रभाग क्र 6 नगर परिषद ले आऊट महसुल विभाग शेत सर्व्हे क्र. 453 मधिल प्लाट क्रा [1,2,3,4] चे जागेवर प्लॉटचे एकुण क्षेत्रफळ 750.81 चौ. मि. पैकी तळमाळा बांधकाम 432.93 चौ.मि. व पहिला माळा 432.93 चौ. मी., दूसरा माळा 358.86 चौ. मी., तिसरा माळा 358.86 चौ. मी., चौथा माळा 358.86 चौ. मी., एकुण 1771.01 चौ. मी., क्षेत्रात निवासी/वाणिज्यिक बांधकामास नकाशात लाल शाईने दर्शविल्यानुसार खालील अटी व शर्तीस अधिन राहुन मंजुरी जोता लेवलपर्यंत देण्यात येते.

## अटी व शर्ती

१) बांधकामास मंजुरी हे मूळचे बांधकाम परवानगी आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन सदर मंजुरी एक वर्ष वैध राहील त्यानंतर स्वत:ला अर्ज करुन नुतनीकरण करुन घ्यावे लागेल.

२) बांधकाम सोबतचे मंजुर नकाशाप्रमाणे असावे. मंजुरी व्यतीरीक्त बांधकाम करु नये ,जादाचे बांधकाम करावयाचे झाल्यास मंजुरी घेवुनच करावे . अन्यथा परवानगी शिवाय अथवा परवानगी पेक्षा जादा जागेत बांधकाम केल्यास महा. प्रादेशिक नगर रचना अधि.१९६६ चे कलम ५२ व ५३ नुसार नगर परिषदेमार्फत कार्यवाही केले जाईल.

३) शेजाऱ्यांचे जागेवर/ रस्त्यावर /बोळ/ गटार त्यावर अतिक्रमण होण्यार नाही याची दक्षता घ्यावी, तसेच बांधकाम पाडुन घ्यावे लागेल.

४) नकाशात दर्शविल्याप्रमाणे योग्य समास सोडुन बांधकामास सुरवात करावी

५) आवार भिंत बांधकामास शेजाऱ्यांचे / शासकीय जागेकडे दारे, खिडक्या , गटार वा इतर ओपनिंग ठेवु नये . आवार भिंतीची उंची दीड मटिर पेक्षा उंच वाठवु नये.

६) आपल्या घराचे सांडपाण्याचे रितसर व्यवस्था करावी व त्यापासुन कोणसही त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी.

७) बांधकाम आवारात कमीत कमी दहा वृक्षाची लागवड करावी.

८) इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्यावर बांधकाम पुर्ण झाल्याचे पुर्णत्व प्रमाण पत्र (सी.सी.प्रमाणपत्र) प्राप्त करुनच इमारत उपयोगात आणावी.

९) बांधकाम साहीत्यापासुन शेजाऱ्यास किंवा रहदारीस त्रास होणार नाही याची काळजी म्हणुन रस्त्यावर बांधकामाचे साहीत्य राहणार नाही. अन्यथा साहीत्य जप्त करता येईल.

१०) संडासाचे बांधकाम करतांना संडासाचे पाईप थेट नगर पालीकेच्या नालीला जोडण्यात येउ नये.

११) आपणाकडुन दस्ताऐवजावर परवानगी दिल्यानंतर कोणत्याही प्रकारची जमिनीबाबतआक्षेप आल्यास व वाद निर्माण झाल्यास आपले सुरु असलेले बांधकाम बंद करावेलागेल आणि होणाऱ्या न्यायालयीन प्रकरण व इतरत्र बाबीस आपण वैयक्तीक जबाबदार राहणार.

मागे पहा

१२)आपले घराचे जोत्याचे बांधकाम (बेसमेंट) जमिनीपासुन कमीतकमी ५ फुट ते सहा फुट असलेच पाहीजे.

१३) नियमित बांधकाम भुकंप रोधक करण्याचे दृष्टीने आपणांस बांधकाम चालु करण्यापुर्वी सक्षम स्थापत्य अभियंताकडुन भारतीय मानक संस्थेने प्रमाणित केल्याप्रमाणे नकाशे वआराखडे सादर करणे बंधनकारक राहील, आणि तसेच आर. सी. सी.डिझायनर कडुन कॉलम बिम व स्लबचे डिझाइन (भुकंपरोधक) करुनच सक्षम स्थापत्य अभियंत्याच्या देखरेखी खाली स्लॅबचे व उतर बांधकाम पुर्ण करावे लागेल.

१४) भुकंपरोधक आणि पक्के बांधकाम करण्यासाठी आपले बांधकाम सादर केलेले नकाशा व आराखड्यानुसार आणि भारतीय मानक संस्थेने विहित केलेल्या तरतुदीनुसार सक्षम स्थापत्य अभियंत्याच्या देखरेखीखाली बांधकाम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र त्या सक्षम अभियंत्याकडुन घेउन नगर परिषदेला सादर करावे लागेल, त्यानंतरच नगर पालीकेकडुन बांधकाम पुर्ण केल्याचा दाखला देण्यात येईल.

१५) जोत्यापर्यत बांधकाम पुर्ण झाल्यावर नगर परिषदेला कळविणे बंधनकारक राहील

१६) सदर्हु बांधकाम चालु असतांना आपण १२,१३,१४,१५,नुसार कारवाई केल्याचे कळविल्यानंतर नगर परिषदेचे ओव्हरसिअर हे जेव्हा कामास भेट देतील तेव्हा तेव्हा वरील प्रमाणे हात असलेल्या कामाची नोंदवही ठेवुन तशी नोंद घ्यावी आणि त्यांनी दिलेल्या सुचनेनुसार पुढील बांधकाम करणे बंधनकारक राहील.

१७) वरील प्रमाणे अटी व शर्तीची पुर्तता न केल्यास भुकंपाचेवेळी व कच्चे बांधकाम केल्यामुळे किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे व सदरील बांधकामामुळे दुर्घटना होवुन कोणतीही जिवित किंवा वित्त हाणी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्यावर राहील.

**१८) या वरील अटीचे उल्लंघन झाल्यास केलेले बांधकाम अवैध समजण्यात येईल , आणि आपणास दिलेली बांधकाम परवाणगी रद्द करण्यात येईल. या करीता सर्व अटींचे पालन करण्याच्या शर्तीवरच आपणास बांधकाम परवाणगी देण्यात येत आहे.**

१९) शासनाचे आदेशानुसार बांधकाम करतांना फ्लॉय अॅश विटांचा वापर करावा.

२०) छतावरील पावसाचे पाणी (Rain Water Harvesting) साठवणुकीची स्वतंत्र व्यवस्था करावी.

२१) महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.अपाऊ २००७ /प्र.क्र.५९०/उर्जा-७ दि.११/९/२००७ व नगर परिषद साधारण सभा ठराव क्र. ६ दि.५/८/२००८अनुसार शासनाने सैर उर्जवरील गरम पाण्यांचे सयंत्र स्वखर्चाने बसविणे न.प. क्षेत्रातील नागरीकांना बंधनकारक केले आहे. तरी त्याप्रमाणे आपण कार्यवाही करावी.

२२) सदर ईमारतीमध्ये अग्निशामक प्रतिबंधक उपाय योजना आपले स्तरावर करुन घ्यावी नैसर्गिक आपत्तीमुळे व ईतर दुर्घटना होवुन कोणतीही जिवित किंवा वित्त हाणी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्यावर राहील.

२३) बांधकाम परवानगी क्रं CCWPM/B/२०१९/APL/०००१२ दि. १४/०६/२०१९ मधील अटी व शर्ती या सुधारित बांधकाम परवानगीस लागू राहतील.

वरील अटींचे पालन न केल्यास दिलेली बांधकाम परवानगी रद्द समजण्यात येईल.

सहपत्र :- बांधकाम मंजुरी नकाशाची प्रत

Pulgaon Municipal Council SEAL Dist. Wardha

12/02

**मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, पुलगाव**

**प्रतिलीपी:-**१) कनिष्ठ अभियंता, न.प.पुलगांव

२) मुख्य कर संग्राहक, न.प. पुलगाव
नविन बांधकामाची प्रत्यक्ष तपासणी करुन नियमानुसार नोंद घेवुन कर आकारणीची कार्यवाही करावी.

—स्वा

**मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, पुलगाव**